# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ

दूरध्वनी क्रमांक : ०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६९७३४१
०२०२५६०११५४

फॅक्स क्रमांक : ०२०२५६०११५४

गणेशखिंड, पुणे ४११००७.

**जा. क्र. वि.वि.मं. २०१९-२०/ ९२०** **दि. २९ एप्रिल २०२०**

प्रति,

**मा. प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
महाविद्यालये / परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक विभाग.

**विषय –** कोरोनामुक्ती जागृती अभियानांतर्गत फेस मास्क चे उत्पादन व निःशुल्क वितरण ..

**महोदय / महोदया,**

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या सार्वत्रिक संकटाचा सामना करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विविध विभाग, यंत्रणा तसेच अनेक संलग्नित महाविद्यालये, परिसंस्था आपआपल्या परीने प्रयत्न करीत आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांबरोबरच विद्यार्थी विकास, क्रिडा, राष्ट्रीय छात्र सेना तसेच इतर शैक्षणिक शाखा अशा विविध विभागांशी संबद्ध विद्यार्थी ; आपले मा. प्राचार्य, विद्यार्थी कल्याण अधिकारी, कार्यक्रम अधिकारी, क्रिडा संचालक, सहयोगी राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी व सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली या लढ्यात विद्यापीठाच्या बाजूने कार्यरत आहेत.

फेस मास्क (चेहऱ्यासाठी संसर्ग प्रतिबंधात्मक आवरण) तयार करून वितरीत करणे, मदत साहित्य संकलन व वितरण करणे, रक्तदात्या विद्यार्थ्यांची सूची तयार करणे, परिसरातील दहा कुटुंबांना आधार देण्यासाठी त्यांचे पालकत्व स्वीकारणे अशा अनेक स्वरुपात आपले विद्यार्थी मदतकार्यात सहभाग घेत आहेत. सर्व प्रयत्नांना सकारात्मक पाठबळ देण्यासाठी ; 'विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतिने, **फेस मास्क** चे उत्पादन करून त्याच्या निःशुल्क वितरण करण्यासाठी इच्छूक व पात्र महाविद्यालये तथा परिसंस्थांकडून कडून प्रस्ताव मागवण्यात येत आहेत.

या योजने अंतर्गत विद्यार्थी कल्याण अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी या **दोहोंच्या** मार्फत संयुक्त प्रस्ताव सादर करण्यात यावेत. या अंतर्गत महाविद्यालयातील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांपैकी जास्तीत जास्त स्वयंसेवी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतानाच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा या कामात स्वेच्छेने विनामोबदला सहकार्य करू इच्छिणाऱ्या अन्य व्यक्तिंना देखिल आवश्यकतेनुसार सहभागी

दूरध्वनी क्रमांक : ०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६९७३४१
०२०२५६०११५४

फॅक्स क्रमांक : ०२०२५६०११५४

गणेशखिंड, पुणे ४११००७.


करून घ्यावे. सामाजिक दायित्वाच्या भावनेने किमान २,५०० फेस मास्क तयार करून निःशुल्क वाटप अथवा वितरित करणारी पात्र महाविद्यालये व परिसंस्थांना या योजने अंतर्गत कमाल **रु. १०,००० (अक्षरी रुपये दहा हजार)** प्रोत्साहनपर अर्थसाह्य देण्यात येणार असून, **ही रक्कम फक्त कापड उपलब्ध करून घेण्यासाठीच** वापरण्यात यावी. आपल्या कार्यक्षेत्रात सध्या अनेक विद्यार्थी घरी राहूनच स्वेच्छेने विनामोबदला फेस मास्क तयार करीत असून त्यांना कच्चा माल उपलब्ध करून देण्यासाठीच ही रक्कम वापरण्यात यावी. या योजनेच्या कार्यान्वयनातील प्रत्येक टप्प्यावर या आधारे प्रत्येक व्यक्तिला शासन-प्रशासनाच्या टाळेबंदी-संचारबंदी विषयक सूचनांचे तंतोतंत पालन करणे अत्यंत बंधनकारक असून; ही योजना राबवताना विद्यार्थी, प्राध्यापक तथा अन्य संबंधितांच्या सुरक्षिततेविषयी आपल्या स्तरावर जबाबदारी व दक्षता घेण्यात यावी.

सदर प्रस्ताव : **(www.unipune.ac.in – Students' Developement – BSW Online – College Login_–For College Users – Login – Main Menu – Students Developement – COVID19 मास्क उत्पादन प्रस्ताव )** येथे ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत. टाळेबंदी-संचारबंदी च्या पार्श्वभूमीवर सदर प्रस्तावाची प्रिंट काढून या कार्यालयाकडे पाठवणे आवश्यक **नसून** त्या संदर्भात यथावकाश सूचित करण्यात येईल. प्रस्ताव सादर करण्याची लिंक सध्या उपलब्ध राहणार असून पूर्वसुचनेनंतरच ती अनुपलब्ध होईल. या योजनेचा कार्यपूर्ती अहवाल, देयके, हिशोब यासंबंधी देखिल पुढील परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येईल.

कळावे, ही विनंती.

**(डॉ. प्रभाकर देसाई )**
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

**( डॉ. संतोष परचुरे )**
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ